admn 19-20


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

(महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मधील कलम १२ नुसार स्थापित)

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com संकेतस्थळ : www.mcaer.org दूरध्वनी (०२०) २५५२८६८८


जा.क्र. मकृप/शिक्षण-१/५१९/ ९४३ दि.२४एप्रिल,२०१९

## परिपत्रक

**विषयः- पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया कृषी विद्यापीठस्तरावर करणेबाबत.**

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेची ९८ वी बैठक दि.७/३/२०१९ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये विषयाधीन प्रकरणी प्रस्ताव सादर करण्यात आला असता, खालील ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

<u>ठराव क्र.०४/९८/२०१९</u>

**"कृषी विद्यापीठांची मागणी आणि कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय दि.३०/५/२०१८ मधील सूचना विचारात घेता, राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून संबंधित कृषी विद्यापीठस्तरावर करण्यास कृषी परिषद मान्यता प्रदान करते."**

यास्तव कृषी विद्यापीठांतर्गत पदविका, कृषी तंत्रनिकेतन, मत्स्य पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यालयांना या परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते की, सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून प्रवेश प्रक्रियेसंदर्भात संबंधित कृषी विद्यापीठांशी संपर्क साधावा. सदर प्रवेश प्रक्रियेबाबत कृषी परिषदस्तरावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही अथवा प्रक्रिया होणार नाही, याची नोंद घ्यावी.

**(महेन्द्र ब. वारभुवन भा प्र से)**
**महासंचालक**

प्रति,

चारही कृषी विद्यापीठांतर्गत पदविका, कृषी तंत्रनिकेतन, मत्स्य पदविका अभ्यासक्रमाची सर्व विद्यालये.

प्रतः-

१. कुलसचिव / अधिष्ठाता (कृषी), महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी
   यांना कृषी परिषदेच्या ठरावानुसार कृषी विद्यापीठस्तरावर योग्य त्या कार्यवाहीस्तव.
२. मे. जे. डीन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे.
   यांना सूचित करण्यात येते की, कृषी विद्यापीठांतर्गत सर्व विद्यालयांना अवगत होण्याकरिता सदर परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावे.

Scanned by CamScanner